# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

ज्ञानगंगा घरोघरी

नॅक मानांकित 'अ' श्रेणी

जा. क्र. यचममुवि /बाआअध्यासन/२०२४/547 दिनांक : ०६/१२/२०२४

## परिपत्रक

मा. कुलगुरू यांच्या मान्यतेनुसार आपल्या विद्यापीठातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासनाच्या वतीने महापरिनिर्वाण दिनानिमित्तखालील तपशिलाप्रमाणे (झूम प्लटफॉर्मद्वारे)ऑनलाईन व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे.

| | | |
|---|---|---|
| **विषय** | : | " डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि संविधान निर्मिती " |
| **व्याख्याते** | : | डॉ. श्रीरंजन आवटे (पुणे) |
| **दिनांक** | : | 06 डिसेंबर 2024 |
| **वेळ** | : | दुपारी 3.00 वाजता |

सर्व नियमित शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, अधिकारी, शैक्षणिक सल्लागार, शैक्षणिक संयोजक, कंत्राटी कर्मचारी तसेच विद्यार्थ्यांनीखालील क्यूआर कोड स्कॅन करून सदर व्याख्यानात सहभागी व्हावे, ही विनंती.

**Meeting ID: 880 2641 7907**
**Passcode: samvidhan (संविधान)**

कुलसचिवाकरिता

**प्रत - माहितीसाठीव उचित कार्यवाहीस्तव**

१. मा. कुलगुरू यांचेकार्यालय
२. मा. प्र-कुलगुरू यांचे कार्यालय
३. सर्व विभाग / केंद्र / कक्ष / विद्याशाखा, प्रमुखयांना विनंती करण्यात येते की, आपल्या अधिनस्त असलेल्या शिक्षक, शिक्षकेतर अधिकारी व कर्मचारी यांच्या निदर्शनास सदरचे परिपत्रक आणून द्यावे.
४. सर्व मा. वरिष्ठ शैक्षणिक सल्लागार, विभागीय केंद्र — अमरावती / छत्रपती संभाजीनगर / मुंबई / नागपूर / नाशिक / पुणे / कोल्हापूर / नांदेड यांना विनंती करण्यात येते की, आपल्या अधिनस्त असलेले सर्व अभ्यासकेंद्र व विद्यार्थी यांना सदरचे परिपत्रक निदर्शनास आणून द्यावे.

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र
मुक्त विद्यापीठ, नाशिक
नॅक मानांकित 'अ' श्रेणी
ज्ञानगंगोत्री, गंगापूर धरणाजवळ, गोवर्धन
नाशिक - ४२२ २२२ (महाराष्ट्र) भारत

ज्ञानगंगा घरोघरी

Yashwantrao Chavan Maharashtra
Open University, Nashik
NAAC Accredited 'A' Grade
Dnyangangotri, Near Gangapur Dam, Govardhan
Nashik - 422 222 (Maharashtra) India

संकेतस्थळ Website : •www.ycmou.ac.in •https://ycmou.digitaluniversity.ac
ई-मेल E-mail : dir_shu@ycmou.digitaluniversity.ac दूरध्वनी Telephone : (0253) 2231475

मानव्यविद्या व सामाजिक शास्त्रे विद्याशाखा / School of Humanities & Social Sciences

दिनांक : ०६/१२/२०२४

**अहवाल**

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासन**

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरीनिर्वाण दिनानिमित्त विशेष व्याख्यान**

**विषय : डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि संविधान निर्मिती**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासन, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक च्या वतीने दि.०६ डिसेंबर २०२४ रोजी दुपारी ०३.०० वा. डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरीनिर्वाण दिनानिमित्त 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि संविधान निर्मिती' या विषयावर ऑनलाईन माध्यमातून विशेष व्याख्यान आयोजित केले होते. या विशेष व्याख्यानासाठी प्रमुख वक्ते डॉ. श्रीरंजन आवटे, राज्यशास्त्र विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे उपस्थित होते. सदर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासन प्रमुख तथा मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखेचे संचालक प्रा. नागार्जुन वाडेकर होते. प्रमुख वक्ते डॉ. श्रीरंजन आवटे यांनी 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि संविधान निर्मिती' या विषयाला अनुसरून उपस्थितांना व्याख्यान दिले.

डॉ. आवटे यांनी व्याख्यानातून भारतीय संविधानाची पार्श्वभूमी व संविधान सभेतील चर्चा, न्यायव्यवस्था, लोकशाही याविषयी मत मांडले. तसेच स्वातंत्र्य, न्याय, समता व बंधुता हि तत्वे लोकशाहीची पूर्व अट असून त्या अटींची पूर्तता झाली तरच लोकशाही यशस्वी होईल, त्या साठी संविधानिक मुल्यांची जोपासना होणे आवश्यक आहे.

संविधान हे भारतीयांचे ओळखपत्र असून डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वतः ला प्रथमतः व अंतिमतः भारतीय मानत. संविधानातील मुलभूत हक्क, संत, महापुरुषांचा समतेचा व बंधुतेचा विचार भारतीय संविधानात आहे, लोकशाही मूल्य, शोषित व दुर्लक्षित घटकांचा विकास, सामाजिक न्याय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे संसदीय लोकशाही विषयक विचार व प्रासंगिकता असे विविध मुद्दे त्यांनी व्याख्यानातून मांडले.

डॉ. बाबासाहेबांच्या विचाराचे सार म्हणजे भारतीय संविधान होय, असे त्यांनी प्रतिपादन केले. शेवटी श्रोत्यांच्या प्रश्नांची उत्तरे व्याख्यात्यांनी दिली. सदर व्याख्यानास बहुसंख्य श्रोते ऑनलाईन झूम च्या माध्यमातून उपस्थित होते.

शेवटी डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासन प्रमुख प्रा. नागार्जुन वाडेकर यांनी व्याख्यानाचा अध्यक्षीय समारोप केला. सदर व्याख्यानाच्या आयोजनासाठी विद्यापीठाचे कुलगुरू मा. प्रा. संजीव सोनवणे, प्रकुलगुरू प्रा. जोगेंद्रसिंग बिसेन, कुलसचिव दिलीप भरड यांचे मार्गदर्शन लाभले. या प्रसंगी शैक्षणिक संयोजक धम्मरत्न जावळे यांनी प्रमुख वक्त्यांचा परिचय तथा कार्यक्रमाचे सूत्रसंचालन करून उपस्थितांचे आभार व्यक्त केले. व शेवटी व्याख्यानाचा समारोप झाला.

Wadekar

प्रा. नागार्जुन वाडेकर
प्रमुख
डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासन